NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १४४ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. ०७ मार्च, २०२२ सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १४४ वी बैठक सोमवार, दि.०७ मार्च, २०२२ सकाळी ११:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. वि. बा. पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. पां. शिखरे | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १०) | ॲड श्रीमती नी. सु. मंकणी | सदस्या |
| ११) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १२) | डॉ. ता. ना. काळेकर | सदस्य |
| १३) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १४) | डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १५) | डॉ. सु. कि. पवार - प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव |

**स्वागत:**

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे, श्री. अ. कि. आवळे व डॉ. अ. उ. उबाळे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) यांनी दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. तसेच डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

प्र.कुलसचिव यांनी दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालील दुरुस्तीसह ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. |
| | • पान क्र. ०२ व विषय क्र. १ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ व UGC Guidelines नुसार स्थानिक निवड समितीमार्फत एकूण ८२ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणेबाबतची प्रक्रिया पूर्ण केल्याची बाब, तसेच कलम १०३(२)(च) नुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी भिन्न (Dissent) मताची नोंद केली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ व UGC Guidelines नुसार स्थानिक निवड समितीमार्फत एकूण ८२ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणेबाबतची प्रक्रिया पूर्ण केल्याची बाब, तसेच कलम १०३(२)(च) नुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी खालील कारणांसाठी भिन्न (Dissent) मताची नोंद केली.<br>सदर भरती प्रक्रियेत मागावर्गीय प्रवर्गातील काही पात्र उमेदवारांवरती अन्याय झाल्याचे दिसून आले आहे. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

| | |
|---|---|
| | • पान क्र. ०२ व विषय क्र. १ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळणेसाठीचे शुल्क अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांकडून अंतिम सत्राचा परीक्षा फॉर्म भरतेवेळी परीक्षा शुल्कासहीत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क ६००/- रुपये विद्यार्थ्याकडून स्विकारण्यास व DigiLocker वर प्रती प्रमाणपत्र डाटा अपलोड करण्यासाठी वेळोवेळी शासन निर्देशानुसार विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क आकारण्याची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | दि.०५/१०/२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.१४(१) यास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळणेसाठीचे शुल्क अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांकडून अंतिम सत्राचा परीक्षा फॉर्म भरतेवेळी परीक्षा शुल्कासहीत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क व DigiLocker वर प्रमाणपत्र डाटा अपलोड करण्यासाठी मिळून रु. ६००/- विद्यार्थ्याकडून स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | • पान क्र. ०५ व विषय क्र. ४ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत एक / दोन दिवशीय कार्यशाळेचे नियमितपणे आयोजन करुन प्रती विद्यार्थी रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय उपकरण केंद्रामार्फत एक / दोन दिवशीय कार्यशाळेचे नियमितपणे आयोजन करुन प्रती विद्यार्थी रु.१००/- इतके शुल्क आकारणी करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.<br>तसेच कार्यशाळेमध्ये सहभाग घेणे विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल असे ठरले. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

- पान क्र. ०६ व विषय क्र. ५ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

पूर्वीचा ठराव

प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित / कंत्राटी महिला अधिकारी / कर्मचारी व परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थीनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर डॉक्टर म्हणून नियुक्ती देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घ्यावी.

दुरुस्त केलेला ठराव

प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत असलेल्या नियमित / कंत्राटी महिला अधिकारी / कर्मचारी व परिसरातील विविध संकुलात शिक्षण घेणाऱ्या व मुलींच्या वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थीनींकरिता स्त्री डॉक्टरांची मानसेवी तत्वावर डॉक्टर म्हणून नियुक्ती देणेबाबत तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

- पान क्र. ०८ व विषय क्र. ६ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

पूर्वीचा ठराव

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल स्विकारुन, सेवाजेष्ठता यादी तयार करणेकामी मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. ४ मध्ये खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

४. सेवाजेष्ठता यादी तयार करताना सध्या लागू असणारे व भविष्यात पारित होणारे सर्व शासन निर्देश लागू राहतील.

दुरुस्त केलेला ठराव

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठाला मंजूर पदांपैकी गट 'ड' मधून गट 'क' कनिष्ठ लिपिक या संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता रिक्त असलेल्या जागेवर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी धोरण ठरविण्यासाठी व अनुषंगिक मार्गदर्शक तत्वे (Guidlines) तयार करणेकामी गठीत समितीचा दि.१७/१२/२०२१ रोजीचा अहवाल स्विकारुन, सेवाज्येष्ठता यादी तयार करणेकामी मार्गदर्शक सूचनांमधील अ.क्र. ४ मध्ये खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

४. सेवाज्येष्ठता यादी तयार करताना गट ड मधील पदावर -

अ) कर्मचारी समान स्तरावर (Tie) होत असतील तर खालील कार्यपध्दती अवलंबावी:

(i) रुजू दिनांक व रुजू वेळ विचारात घ्यावी.

(ii) संबंधित भरती वर्षातील निवड परीक्षेचे एकूण प्राप्त गुण विचारात घ्यावी.

(iii) तद्नंतर वयज्येष्ठता विचारात घ्यावी.

आ) सर्व पदनामांची भरतीसाठीच्या निवड परिक्षेचे एकुण गुण एकसमान असाव्यात, विविक्षित ठीकाणी ते एकसमान करण्यासाठी रुपांतरीत करुन घेण्यात यावीत.

- अनुकंपा / लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार अथवा अन्य माध्यमातून नियुक्ती झाली असल्यास-

अ) त्या सेवकाचा रुजु झाल्याचा दिनांक तद्नंतर वय ज्येष्ठता आणि शैक्षणिक पातळी अशा क्रमाने प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा.

- सेवाज्येष्ठता यादी तयार करत असताना प्रस्तुत विद्यापीठासाठी लागू झालेला २०१० चा आकृतीबंद व सध्या लागू असलेले शासन निर्णय विचारात घ्यावे.

- पान क्र. १० व विषय क्र. ८ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

पूर्वीचा ठराव

सन २०२३-२४ या वर्षापासून विद्यापीठ तसेच सर्व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या अपघाती रक्कमेत रु.१०,००,०००/- ऐवजी रु.२०,००,०००/- तसेच किरकोळ अपघातात मिळणारी मेडीक्लेमची रक्कम रु.१,००,०००/- ऐवजी रु. २,००,०००/- अशी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

दुरुस्त केलेला ठराव

सन २०२२-२३ या वर्षापासून विद्यापीठ तसेच सर्व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्या अपघाती रक्कमेत रु.१०,००,०००/- ऐवजी रु.२०,००,०००/- तसेच किरकोळ अपघातात मिळणारी मेडीक्लेमची रक्कम रु.१,००,०००/- ऐवजी रु. २,००,०००/- अशी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- पान क्र. ११ व विषय क्र. ९ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**पूर्वीचा ठराव**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिनी दरवर्षी एकूण ५५ सुवर्णपदके विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येतात. सद्य:स्थितीत कोरोना महामारीच्या प्रादूर्भावामूळे बँकेतील मुदत ठेवीचे व्याजदर कमी झाले आहेत व सोने आणि चांदीच्या दरामध्ये वाढ झाली असल्याने जमा होणारे व्याज व सुवर्णपदक तयार करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये अंदाजे रु.१,२५,०००/- इतकी तफावत निर्माण होत आहे. त्यामुळे यापुढे होणाऱ्या दीक्षांत समारंभासाठी सुवर्णपदके तयार करुन घेणेकामी होणारा अतिरिक्त खर्च, विद्यापीठ फंडातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**दुरुस्त केलेला ठराव**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिनी दरवर्षी एकूण ५५ सुवर्णपदके विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येतात. सद्य:स्थितीत बँकेतील मुदत ठेवीचे व्याजदर कमी झाले आहेत व सोने आणि चांदीच्या दरामध्ये वाढ झाली असल्याने जमा होणारे व्याज व सुवर्णपदक तयार करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चामध्ये अंदाजे रु.१,२५,०००/- इतकी तफावत निर्माण होत आहे. त्यामुळे यापुढे होणाऱ्या दीक्षांत समारंभासाठी सुवर्णपदके तयार करुन घेणेकामी होणारा अतिरिक्त खर्च, विद्यापीठ फंडातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- पान क्र. १३ व विषय क्र. ११ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**पूर्वीचा ठराव**

विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधनिक लेखापरिक्षण करण्यासाठी M/s. SKVM & Company यांना मागील वर्षाच्या दराने पुर्ननियुक्ती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**दुरुस्त केलेला ठराव**

विद्यापीठाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधनिक लेखापरिक्षण करण्यासाठी M/s. SKVM & Company यांना मागील वर्षाच्या दराने पुर्ननियुक्ती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.२ श्री. सिद्धेश्वर वुमन पॉलीटेक्नीक, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या सामंजस्य कराराची बाब माहितीस्तव.

(टिपणी: Shri Siddheshwar Womens Polytechnic, Solapur चे प्राचार्य यांच्याकडून ई-मेलद्वारे सामंजस्य कराराबाबत पत्र प्राप्त झाले होते. या करारामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

A) Industrial Visit of Students/Staff.
B) One month Implant Training of Students.
C) Organizing Career Counseling Lectures for wards of Employees in your organization.
D) Three days Computer Awareness Programme for employees in your organization.

सबब, वरीलप्रमाणे श्री.सिद्धेश्वर वुमन पॉलीटेक्नीक, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यातील सामंजस्य करारास मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य कराराचा मसुद्यास व करार केल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | श्री. सिद्धेश्वर वुमन पॉलीटेक्नीक, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य करार केल्याची नोंद घेण्यात आली. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.३ Splashgain Technology Solutions Pvt. Ltd., Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या सामंजस्य कराराची बाब माहितीस्तव.

(टिपणी: Splashgain Technology Solutions Pvt. Ltd., Pune यांचेकडून ई-मेलद्वारे सामंजस्य कराराबाबत पत्र प्राप्त झाले होते. या करारामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

A) Organizing workshops on Technology and personality Development.

B) Arrange the Placements of Trained Students.

सबब, वरीलप्रमाणे Splashgain Technology Solutions Pvt. Ltd., Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यातील सामंजस्य करारास मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य कराराचा मसुद्यास व करार केल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | Splashgain Technology Solutions Pvt. Ltd., Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य करार केल्याची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.४ कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (रयत शिक्षण संस्था) व Deparment of Mathematics, संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या सामंजस्य कराराची बाब माहितीस्तव.

(टिपणी: कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (रयत शिक्षण संस्था) यांच्यासोबत झालेल्या सामंजस्य करारामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

As per MOU, Department of Mathematics, School of Computational Science, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur help, the institute by granting the permission for;

a) Mathematics software training programs
b) Guest lecture as per the expertise available in the university.
c) Project of Final Year Students.
d) Training and placement for final year Students.
e) Research and Academic interaction of faculties and students between the two institutions.
f) Exchange of faculties

Department of Mathematics of, Rayat Shikshan Sanstha's, Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalay, Pandharpur will help, by providing platform to organize following events;

a) Organization of Career Counselling lectures for the students of Mathematics
b) Organization of Workshop on "New Trends in Mathematics"
c) Organization of training programs on Mathematics Software's.

सबब, वरीलप्रमाणे रयत शिक्षण संस्था, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर व Deparment of Mathematics, संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यातील सामंजस्य करारास मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य कराराचा मसुद्यास व करार केल्याची बाब माहितीस्तव).

| ठराव : | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (रयत शिक्षण संस्था) व Deparment of Mathematics, संगणकशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यासोबत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सामंजस्य करार केल्याची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

विषय क्र.५ शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.१८२८/२०११ व याचिका क्र.४४८७/२०२१ मध्ये दि.०७/१०/२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेश झालेले आहेत.

I. The impugned the orders dated 25th September 2008 and 11th June 2010 annexed at Exhibits 'G' and 'J' respectively are quashed and set aside.
II. The petitioner would be at liberty to make an application for renewal of affiliation initially granted to the petitioner to the university under the provisions of Maharashtra Public Universities Act, 2016.
III. If any such application is made by the petitioner, the same would be considered by the university in accordance with the provisions of the Maharashtra Public Universities Act, 2016 and in accordance with law.
IV. Upon the petitioner complying with the conditions set out therein, the university shall grant renewal of affiliation within eight weeks from the date of receipt of such application for renewal of affiliation.
V. The petitioner is directed to withdraw all civil and criminal proceedings in compliance with the undertaking rendered before this Court within four weeks from today before the appropriate Court and shall inform the same to the respondents' advocate within one week from the date of the said withdrawal.
VI. It is made clear that if the petitioner is granted renewal of affiliation by the respondent no.1 university, all benefits and entitlement of the petitioner which would be available to the petitioner shall be restored including the payment of grant-in-aid from the date of renewal of affiliation."

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.१८२८/२०११ व याचिका क्र.४४८७/२०२१ मधील दि.०७/१०/२०२१ रोजीच्या आदेशानुसार मा.सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाकरिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. व्ही. पी. शिखरे | (अध्यक्ष) |
| २. | प्राचार्या डॉ. श्रीमती एम. डी. गायकवाड | (सदस्या) |
| ३. | मा. विभागीय सहसंचालक, (उ.शि.), सोलापूर | (सदस्य) |
| ४. | श्री. एस. बी. तानवडे | (सदस्य) |

उक्त समिती अध्यक्ष व सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने बी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता खालील अटींच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे.

१. बी.ए. भाग १ ते ३ या वर्गासाठी आवश्यक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालय सुरु होताना असणे आवश्यक आहे. त्या संदर्भात विद्यापीठ व शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.
२. बी. ए. भाग १ ते ३ भूगोल विषयासाठी प्रयोगशाळेत Weather Instruments, GIS Software, Computer with internet उपलब्ध करुन द्यावे.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

३. महाविद्यालयात उपलब्ध असलेली साधने, फर्निचर, बेंचेस, टेबल, खुर्च्या इ. वस्तूंवर विहित पध्दतीने कायम स्वरुपी नोंदी करुन त्या सर्व वस्तूंची विहित पध्दतीने DSR (Dead Stock Register) मध्ये नोंदी कराव्यात.

४. बी. ए. भाग १ ते ३ साठी प्रत्येक विषयांसाठी अभ्यासक्रमनिहाय वेगवेगळ्या प्रकाशनांची Textbooks आणि अभ्यासक्रमात सूचविलेली Reference books खरेदी करावीत.

५. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे संगणकीकरण (Library Automation) करणे आवश्यक आहे. तसेच Internet सुविधेसह ग्रंथालयात किमान ३ संगणकांची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

६. ग्रंथालयात E-resources करिता INFLIBNET N-LIST ची मेंबरशीप घ्यावी.

७. ग्रंथालयात किमान १५ जर्नल्स विषयाला अनुरुप सुरु करावेत आणि इंग्रजी व मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रे किमान ०५ सुरु करावीत.

८. शिक्षक व विद्यार्थी यांचेसाठी योग्य बैठक व्यवस्थेसह स्वतंत्र वाचन कक्ष विकसित करावेत.

९. महाविद्यालयात सर्व सोयींसुविधांनी युक्त असे अद्ययावत सभागृह विकसित करावे.

१०. दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी.

११. महाविद्यालयाने स्वत:चे संकेतस्थळ (Website) विकसित करावे.

१२. महाविद्यालयात अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

उपरोक्त अटीपूर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्याची बाब दि.३१/१२/२०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीसमोर विचारार्थ सादर केली असता, त्यावर विद्या परिषदेने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

"शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या बी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली."

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१/३९५, दि.१५/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये बी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने सर्वानुमते मान्यता दिल्याचे कळविण्यात आलेले आहे.

सबब, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव :** | **शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.६ शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.१८२८/२०११ व याचिका क्र. ४४८७/२०२१ मध्ये दि.०७/१०/२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेश झालेले आहेत.

I. The impugned the orders dated 25th September 2008 and 11th June 2010 annexed at Exhibits 'G' and 'J' respectively are quashed and set aside.
II. The petitioner would be at liberty to make an application for renewal of affiliation initially granted to the petitioner to the university under the provisions of Maharashtra Public Universities Act, 2016.
III. If any such application is made by the petitioner, the same would be considered by the university in accordance with the provisions of the Maharashtra Public Universities Act, 2016 and in accordance with law.
IV. Upon the petitioner complying with the conditions set out therein, the university shall grant renewal of affiliation within eight weeks from the date of receipt of such application for renewal of affiliation.
V. The petitioner is directed to withdraw all civil and criminal proceedings in compliance with the undertaking rendered before this Court within four weeks from today before the appropriate Court and shall inform the same to the respondents' advocate within one week from the date of the said withdrawal.
VI. It is made clear that if the petitioner is granted renewal of affiliation by the respondent no.1 university, all benefits and entitlement of the petitioner which would be available to the petitioner shall be restored including the payment of grant-in-aid from the date of renewal of affiliation.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. १८२८/२०११ व याचिका क्र. ४४८७/२०२१ मधील दि.०७/१०/२०२१ रोजीच्या आदेशानुसार मा. सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा यांनी संस्थेचे संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाकरिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. व्ही. पी. शिखरे | (अध्यक्ष) |
| २. | प्राचार्य डॉ. एस. डी. नवले | (सदस्य) |
| ३. | मा. विभागीय सहसंचालक, (उ.शि.) सोलापूर | (सदस्य) |
| ४. | श्री. एस. बी. तानवडे | (सदस्य) |

उक्त समिती अध्यक्ष व सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता खालील अटींच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे.

१. बी.एस्सी. भाग १ ते ३ साठी आवश्यक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालय सुरु होताना असणे आवश्यक आहे. त्या संदर्भात विद्यापीठ व शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.
२. बी. एस्सी. भाग १ व २ साठी Physics विषयासाठी प्रयोगशाळेत Optical Bench व इतर साहित्य Purchase order नुसार खरेदी करुन त्याची विहित नमुन्यात DSR (Dead Stock Register) मध्ये नोंदी कराव्यात.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

३. बी. एस्सी. भाग १ ते ३ साठी Chemistry विषयासाठी प्रयोगशाळेत Physical Chemistry च्या प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक साधने खरेदी करावीत. तसेच Chemicals, Fire Extinguisher Refilling याबाबत अद्यायवतीकरण करणे आवश्यक आहे. खरेदी केलेल्या साहित्यांची DSR मध्ये विहित नमुन्यात नोंदी कराव्यात. प्रयोगशाळेसाठी आवश्यक Distilled Water, Gas Cylinders इत्यादीची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.

४. बी.एस्सी. भाग १ व २ साठी Botany आणि Zoology विषयासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा हव्यात. तसेच सदर प्रयोगशाळेसाठी आवश्यक साहित्यांची Purchase Order नुसार खरेदी करुन DSR मध्ये विहित नमुन्यात नोंदी कराव्यात.

५. महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेली साधने, फर्निचर इ. वस्तुंवर विहित पध्दतीने कायम स्वरुपी नोंदी असणे आवश्यक आहे. तसेच त्या सर्व वस्तूंची विहित पध्दतीने DSR मध्ये नोंदी कराव्यात.

६. बी. एस्सी. भाग १ ते ३ साठी प्रत्येक विषयासाठी अभ्यासक्रमनिहाय Textbooks वेगवेगळया प्रकाशनाची खरेदी करावेत. तसेच आवश्यक त्या Reference Books ची खरेदी करावी.

७. ग्रंथालयाचे संगणकीकरण करिता (Library Automation) इंटरनेट सुविधेसह किमान तीन संगणकांची सुविधा उपलब्ध करुन दयावी.

८. ग्रंथालयासाठी E-resources करिता Inflibnet N-LIST ची मेंबरशीप घ्यावी.

९. शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी स्वतंत्रपणे वाचन कक्ष विकसित करावेत.

१०. ग्रंथालयात किमान १५ जर्नल्स व ०५ दैनिक वर्तमानपत्रे सुरु करावीत.

११. महाविद्यालयाचे सभागृह सर्व सोयींनी युक्त असे अद्ययावत करावे.

१२. दिव्यांग व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी.

१३. महाविद्यालयाने स्वत:चे संकेतस्थळ (Website) विकसित करावी.

१४. महाविद्यालयात अद्ययावत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

उपरोक्त अटीपूर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्याची बाब दि.३१/१२/२०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीसमोर विचारार्थ सादर केली असता, त्यावर विद्या परिषदेने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

"शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली."

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१/३९६, दिनांक १५/०१/२०२२ अन्वये बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने सर्वानुमते मान्यता दिल्याचे कळविण्यात आलेले आहे.

सबब, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव : | **शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा संचलित दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरिता स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून विद्या परिषदेने दिलेली मान्यता व विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2022 'B' Grade (CGPA 2.62)

विषय क्र.७ संलग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य पदाच्या चेंजेस इन स्टाफच्या प्राप्त १३५ प्रस्तावांपैकी समितीने ६४ प्रस्ताव शिफारशी केले आणि ७० प्रस्ताव स्थगित ठेवले. मा. व्यवस्थापन परिषदेच्या २६ नोंव्हेबर, २०२१ रोजीच्या झालेल्या बैठकीत शिक्षकांनी चेंजेस इन स्टाफ प्रस्तावातील त्रुटी पुर्तता केल्यानंतर सदरचे प्रस्ताव पुढील बैठकीस सादर करावयाचा ठराव करण्यात आला असल्यामुळे ७० पैकी ३२ शिक्षकांनी त्रुटी पुर्तता केली असल्यामुळे सदर शिक्षकांना चेंजेस इन स्टाफची मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: सलंग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य या पदासाठी चेंजेस इन स्टाफची मान्यता मिळण्याकरिता एकूण १३५ प्रस्ताव प्राप्त झाले होते. १३५ प्रस्तावापैकी ६४ प्रस्ताव समितीने शिफारशी केले आणि ७० शिक्षकांचे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आले. सदरचा विषय दि. २६ नोंव्हेबर, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवले असता, ठराव क्र.२२(९) मध्ये व्यवस्थापन परिषदेने १३५ प्राप्त प्रस्तावांपैकी ६४ शिक्षकांच्या चेंजेस इन स्टाफ प्रस्तावाला मान्यता दिली असून उर्वरित ७० शिक्षकांच्या चेंजेस इन स्टाफ प्रस्तावातील असलेल्या त्रुटी पुर्तता केल्यानंतर पुढील बैठकीस सादर करावयास सांगितले आहे.

समितीने स्थगित ठेवलेल्या ७० शिक्षकांपैकी ३२ शिक्षकांनी त्रुटी पुर्तता केलेली आहे. (सोबत शिक्षकांच्या नावाची यादी जोडली आहे.)

सबब, संलग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य पदाच्या चेंजेस इन स्टाफच्या प्राप्त १३५ प्रस्तावांपैकी समितीने ६४ प्रस्ताव शिफारशी केले आणि ७० प्रस्ताव स्थगित ठेवले. व्यवस्थापन परिषदेच्या २६ नोंव्हेबर, २०२१ रोजीच्या झालेल्या बैठकीत शिक्षकांनी चेंजेस इन स्टाफ प्रस्तावातील त्रुटी पुर्तता केल्या नंतर सदरचे प्रस्ताव पुढील बैठकीस सादर करावयाचा ठराव करण्यात आला असल्यामुळे ७० पैकी ३२ शिक्षकांनी त्रुटी पुर्तता केली असल्यामुळे सदर शिक्षकांना चेंजेस इन स्टाफची मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | सदरचा विषय चेजेस इन-स्टाफ समितीच्या बैठकीमध्ये सादर करुन पुनश्च: व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावा. |

**विषय क्र.८ डॉ. शिवराया चनप्पा अडवितोट यांना सी. बी. खेडगीज महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य पदी भविष्यात मान्यता न देण्याबाबत पुर्नविचार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रा. डॉ. शिवराया चनप्पा अडवितोट, भुगोल विभागप्रमुख, सी. बी. खेडगीज महविद्यालय, अक्कलकोट यांचे दि.०४/०२/२०२२ रोजीचे पत्र (सदरचे पत्र विहित मार्गाने आलेले नाही) अवलोकनार्थ सादर.

सदर पत्रान्वये उक्त महाविद्यालयातील प्रा.डॉ.अडवितोट यांनी त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय सेवेचा तसेच त्यांच्या ३३ वर्षाच्या निष्कलंकीय सेवा कालावधीचा विचार करुन त्यांच्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन भविष्यात प्राचार्य पदावर कार्य करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली आहे.

याबाबत सादर करण्यात येते की, डॉ. अडवितोट यांना या कार्यालयाचे पत्र क्र. सोविसो/शिमा/३७(८)/२०१७-१८/९०९५, दि.१७/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य पदी मान्यता देण्यात आली होती. परंतू सी. बी. खेडगीज कॉलेज, अक्कलकोट या महाविद्यालयामध्ये परीक्षेच्या कालावधीमध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे गठीत केलेल्या चौकशी समितीचा अहवाल व परीक्षा मंडळाने केलेल्या शिफारसीन्वये दि.१६/०१/२०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. ११(१०) मधील ५ नुसार महाविद्यालयातील डॉ. अडवितोट यांना प्राभारी प्राचार्य पदी देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात आली असून भविष्यात प्र. प्राचार्य पदासाठी डॉ.अडवितोट यांना मान्यता देण्यात येणार नाही असे कळविण्यात आले आहे.

सबब, डॉ. शिवराया चनप्पा अडवितोट यांना भविष्यात सी. बी. खेडगीज महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य पदी मान्यता न देण्याबाबत पुर्नविचार करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **डॉ. शिवराया चनप्पा अडवितोट यांचेकडून महाविद्यालयामध्ये भविष्यात कुठल्याही प्रकारचे गैरप्रकार करणार नाही, असे हमीपत्र घेऊन सी. बी. खेडगीज महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयामध्ये विहित प्रक्रियेद्वारे प्रभारी प्राचार्य पदी नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

विषय क्र.९ **विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत कामाच्या निविदा ई-टेंडरिंग पध्दतीने मागविण्यात याव्यात, अशी दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ.सुशील कुमार शिंदे यांनी "विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत कामाच्या निविदा ई-टेंडरिंग पध्दतीने मागविण्यात याव्यात अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे" असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

ठराव क्र. १२ - सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास श्री.सुधाकर तुकाराम सरवदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत कामाच्या निविदा ई-टेंडरिंग पध्दतीने मागविण्यात याव्यात, अशी दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र.१२ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.१० अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: अधिसभा सदस्यांनी दि.१५ मार्च, २०२२ रोजी होणाऱ्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६(१३) नुसार व्यवस्थापन परिषद, अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले. |

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर व्यवस्थापन परिषदेने अंतिम केलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. म. बा. देशमुख | | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी |
| १ | How many depts. have received grants from DST-FIST Programme for the research so far? | Not received grants to Departments on campus from DST-FIST Programme for the research so far. |
| २ | How many, National and International papers published by University during last year? | Number of Papers Published 32 (01/01/2021 to 31/12/2021) |
| श्री. मो. श्या. डांगरे | | डॉ. वि. पां. शिखरे |
| ३ | आताची PET परीक्षा जी झाली, ती २०१९-२० ची झाली. यंदाच्या वर्षीच्या PET परीक्षेचे काय? | PET-८ करिताची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील PET बाबत प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| ४ | परीक्षा शुल्कात यंदाच्या वर्षी आपण किती टक्क्यांनी वाढ केली आहे? | परीक्षा शुल्कात यंदाच्या वर्षी १०% वाढ केली आहे. |
| डॉ. गं. धु. बिराजदार | | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील |
| ५ | मार्च २०२०-२१ परीक्षेच्या गुणपत्रिकेचे Ledger तयार आहे का? | मार्च २०२०-२१ परीक्षेच्या गुणपत्रिकेचे Ledger तयार आहे. |
| ६ | विद्यापीठ विरोधातील विविध न्यायप्रविष्ठ प्रकरणासाठी केल्या जाणाऱ्या खर्चास व्यवस्थापन परिषदेची पूर्व मंजूरी घेतली जाते का? | नाही. |
| श्री. रा. शि. गायकवाड | | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील |
| ७ | विद्यापीठास Electric गाड्यांची खरेदी करताना व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली का? | नाही. |
| डॉ. सु. कु. शिंदे | | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील |
| ८ | सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीत कोणकोणत्या महाविद्यालयांच्या प्रभारी प्राचार्य यांच्या प्रस्तावावर मंजुरी देण्यात आली? | सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीमधील प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित १८ महाविद्यालयांना प्रभारी प्राचार्य पदास मान्यता देण्यात आली आहे. (सदर महाविद्यालयांची यादी सोबत जोडली आहे) |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| श्री. ग. रे. धरणे | | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी |
| ९ | मार्च/एप्रिल २०२० पासून आतापर्यंत प्रॅक्टिकल, ओरल, पेपर सेटिंग चे मानधन संबंधित शिक्षकांना देण्यात आले का? | माहे मार्च/एप्रिल, २०२० पासून आतापर्यंतचे प्रॅक्टिकल ओरल पेपर सेटिंगचे मानधन संबंधित शिक्षकांना देण्यात आलेले आहे. |
| १० | मार्च/एप्रिल २०२० पासून झालेल्या परीक्षांचे विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळाल्या का? | मार्च/एप्रिल २०२० पासून झालेल्या परीक्षांचे गुणपत्रिका ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अंतिम करण्यात आलेली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. |
| श्री ता. ज. गावडे | | डॉ. वि. पां. शिखरे |
| ११ | NAAC साठी रस्ते, रंगकाम इ. कामासाठी टेंडर (Tender) प्रक्रिया राबविली आहे का? | रस्ते कामासाठी होय.<br>रंगकामासाठी नाही. |
| १२ | सन २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षात विद्यापीठ परिसरात वृक्ष लागवडीसाठी किती खर्च करण्यात आला? | Tree Plantation या शिर्षकाखाली सन २०१९-२० मध्ये रु.१,७२,२७५/- व सन २०२-२१ मध्ये निरंक इतकी रक्कम खर्ची पडली आहे. |
| श्री स. मा. गायकवाड | | डॉ. वि. पां. शिखरे |
| १३ | RUSA मार्फत आलेल्या एकूण अनुदानापैकी किती अनुदान व व्याज RUSA संस्थेकडे परत केले आहे? | मिळालेले एकूण अनुदान : रु. २१,०५,२५,०००/-<br>एकूण व्याज : रु. १,२१,२९,८७०/-<br>एकूण : रु. २२,२६,५४,८७०/-<br>पैकी परत केले : रु. ९,०८,५९,९५३/-<br>एकूण खर्च : रु. १३,१७,९४,९१७/- |
| १४ | विद्यापीठाने मंजूर केलेल्या अध्यासन केंद्राची स्थापना झालेली आहे का? | विद्यापीठ अध्यासन केंद्र मंजूर करित नाही. त्यामुळे अध्यासन केंद्राची स्थापना होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| डॉ. तु. वि. शिंदे | | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील |
| १५ | मे, २०१८ पासून पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे कार्यरत असणाऱ्यांपैकी कोणकोणत्या कर्मचाऱ्यांची विद्यापीठाकडून विभागीय चौकशी करण्यात आली? | मे, २०१८ पासून पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे कार्यरत असणाऱ्यांपैकी खालील अधिकाऱ्यांची विद्यापीठाकडून विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे.<br>१) श्रीम. अर्चना सुनिल साळुंखे<br>२) श्री. अनिल बाबुराव जाधव<br>३) श्री. प्रशांत रावसाहेब चोरमले |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १६ | विभागीय चौकशी झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांवर कारवाई करत असताना व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली आहे काय? | लागू नाही. |
| **श्री. सु. तु. सरवदे** | | **प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी** |
| १७ | NAAC साठी रस्ते, रंगकाम इ. कामासाठी लाखो रुपयांच्या खर्चास व्यवस्थापन परिषदेची मान्यता आहे का? | रस्ते, रंगकाम इ. नियमित कामासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतलेली आहे. |
| **श्री. शे. शं. साळुंके** | | **डॉ. वि. पां. शिखरे** |
| १८ | What expenses have been incurred for the NAAC preparation? | सदरचा प्रश्न संदिग्ध स्वरुपाचा आहे. यामध्ये माहिती महसुली खर्चाबाबत हवी आहे की भांडवली खर्चाबाबत हवी आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. तसेच विविध संकुलांनी केलेला खर्च नेमका कोणत्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली टाकलेला आहे याची पडताळणी करणे शक्य नाही. तरीदेखील NAAC-IQAC विभागांतर्गत असलेल्या विविध शिर्षकाखाली लेखाविभागातील लेजरप्रमाणे एकूण रु.९,२८,११३.८०/- इतकी देयके खर्ची पडली आहेत. |

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

प्रश्न क्र.८ करिता सहपत्र

## सोलापूर शहर

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्राचार्य / प्र.प्राचार्य नाव व मोबाईल क्र. |
|---|---|---|
| 1 • | सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, सोलापूर. नेहरु नगर, सोलापूर. ४१३ ००४ Email: sushilbped2012@gmail.com Website: www.ssscopen.org | प्रभारी प्राचार्य श्रीमती. डॉ. देशपांडे (शैक्षणिक वर्ष-२०२० ते २१ करीता) |
| 2 | **कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोलापूर** सर्व्हे नं. ६३/१अ, एफपी नं.३४, उजनी कॉलनी, टी. व्ही. टॉवरच्या पाठीमागे, कुमठा नाका, सोलापूर. ४१३ ००३ Email: archcoa_ssm@rediffmail.com Website: www.archsolapur.org | श्रीमती ए.एन. काटगांवकर (प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार) ७६२०१२२२६२ (शै.वर्ष-२०२० ते २१ मधील प्रथम सत्राअखेर पर्यंत) |
| 3 Aided • | **सोलापूर सोशल असोसिएशनचे, आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.** नवीन इमारत, सैफी हॉस्पिटलच्या समोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३ ००१ Email: socialcollege@gmail.com | प्रभारी प्राचार्य, प्रा. डॉ.आय.जे. तांबोळी |
| 4 • | **शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर.** अभिषेक नगर, उमा नगरी समोर, मुरारजी पेठ, पुना रोड, सोलापूर. ४१३ ००२ Email: spcollege@gmail.com | प्रभारी प्राचार्य, डॉ. एन.व्ही. पाटोळे (शै.वर्ष-२०२०-२१ च्या प्रथम सत्राअखेर पर्यंत मान्यता) |
| 5 Aided • | **युनियन एज्युकेशन सोसायटीचे, महिला महाविद्यालय, सोलापूर.** १४१ ए, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३ ००१. Email: uesmm@yahoo.com Website: www.uesmahilamahavidyalaya.org | प्रभारी प्राचार्या, श्रीमती. डॉ. एफ.एम. शेख ९९६०२३६६१८ (शै.वर्ष-२०१८-१९ ते २०१९-२० व (शै.वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता. |
| 6 Aided • | **कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.** सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक,सोलापूर. ४१३ ००६ ***Email: kcesolapur@gmail.com*** Website: http://kcebed.org | प्रभारी प्राचार्य, डॉ. बोंदार्डे ए.के. ९९६०१९४५०७ शै.वर्ष-२०२१-२२ करीता |

## तालुका अक्कलकोट

| | | |
|---|---|---|
| 7 Aided • | **सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स, राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट.** ता.अक्कलकोट, जि.सोलापूर. ४१३ २१६ | प्रभारी प्राचार्य डॉ. जी.एस. धबाले शै.वर्ष-२०२१-२२ मधील प्रथम सत्रा करीता मान्यतो |

## तालुका बार्शी

| | | |
|---|---|---|
| 8 Aided • | **सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग.** ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०२ Email: ssgm123@gmail.com Website: | प्रभारी प्राचार्य डॉ. शेख एस.ए. (शै.वर्ष-२०२१-२२ करीता) |

| | | |
|---|---|---|
| 9<br>Aided<br>• | **श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.**<br>झाडबुके मार्ग, बार्शी.<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: principalsbzmb@rediffmail.com | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. गादेकर एम.बी.<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |
| 10<br>Aided<br>• | **राजर्षि शाहू लॉ कॉलेज, बार्शी.**<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: rslawbarshi@gmail.com<br>Website: www.rslawcollegebarshi.org | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. गाढवे शशिकांत देविदास<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |
| 11<br>Aided<br>• | **श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी.**<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: ssmb_barshi@rediffmail.com<br>Website: www.ssmbarshi.org | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ. भारती रेवडकर<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |

## तालुका माळशिरस

| | | |
|---|---|---|
| 12 | **समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस.**<br>ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०७<br>Email: sgacmalshiras@gmail.com<br>Website: www.sgcmalshiras.co.in | डॉ. डी.एस. गेजगे<br>(प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार)<br>शै.वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता आहे.) |
| 13<br>Aided<br>• | **शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.** ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०१<br>Email: smmakj@yahoo.com<br>aldeshmukh56@gmail.com<br>website: www.smmakluj.ac.in | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ डी.एस. बागडे<br>शै. वर्ष-२०२०-२१ करीता |
| 14 | **सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर, अकलूज. पोस्ट- यशवंतनगर, पो.बॉ.नं.५, ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११८**<br>Email: smpcht@gmail.com<br>Website: www.smsmpitr.org | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. यादव आय.एन.<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |

## तालुका पंढरपूर

| | | |
|---|---|---|
| 15 | **कॉलेज ऑफ फॉर्मसी, पंढरपूर.**<br>गोपाळपूर-रांजणी रोड, गोपाळपूर.<br>ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४<br>Email: cop_pan@rediffmail.com<br>Website: www.cobp.sveri.ac.in | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. मणियार एम.जी.<br>(शै. वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता) |
| 16 | **महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन, अकलूज.**<br>ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०१<br>Email: mpceakluj@gmail.com<br>Website: | प्रभारी प्राचार्या,<br>डॉ.सौ. जे.ए. धुमाळ<br>९८५००६२७४४ |

## तालुका सांगोला

| | | |
|---|---|---|
| 17<br>Aided<br>• | **विज्ञान महाविद्यालय, सांगोला**<br>**ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७**<br>Email: vidnyanms@yahoo.co.in<br>Website: www.vmssangola.org | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ. फुले आर. ए.<br>(शै.वर्ष-२०२१-२२ करीता) |

## तालुका माढा

| | | |
|---|---|---|
| 18<br>Aided<br>• | **मारुतीराव हरीराव महाडिक कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, मोडनिंब.**<br>ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ ३०१<br>Email: mhmmodnimb@gmail.com<br>rajendragidde@rediffmail.com | प्र-प्राचार्य<br>डॉ.शिवाजी तुकाराम पाटील |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

विषय क्र. ११ (१) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्याबाबत अधिसभेचा ठराव विचारार्थ.

(टिपणी:- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्यात यावा याबाबत अधिसभेच्या दि.२८/०९/२०२१ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.९ अन्वये श्री.सचिन गायकवाड यांनी प्रस्ताव दिलेला होता. सदर विषय दि.०८/१२/२०२१ रोजीच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला असून सदर विषय आगामी व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित करण्याबाबत सर्वानुमते ठरले असा ठराव झाला आहे.

सबब, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना इतर विद्यापीठाप्रमाणे रोख स्वरुपात बक्षीस देण्याबाबत अधिसभेचा ठराव विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत विजेत्या खेळाडूंच्या व्यवस्थापक व मार्गदर्शकांना रोख स्वरुपात बक्षीस देण्यासाठी इतर विद्यापीठाकडून सविस्तर माहिती घेऊन सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा. |

विषय क्र. ११(२) दि.०३/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

(टिपणी:- विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०३/०३/२०२२ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार दि.०३/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि.०३/०३/२०२२ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव | दि.०३/०३/२०२२ रोजीच्या बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | • विषय क्र. ०३ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| | पूर्वीचा ठराव |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी चबुतरा बांधकाम, लॅन्डस्केप, सुशोभिकरण व टॉवर बांधणे इ. कामासाठी रु.१४,२४,९२,२३८/- (रुपये चौदा कोटी चोवीस लाख ब्याण्णव हजार दोनशे अडोतीस फक्त) इतक्या रक्कमेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर यांच्यामार्फत करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. |
| | दुरुस्त केलेला ठराव |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी चबुतरा बांधकाम, लॅन्डस्केप, सुशोभिकरण व टॉवर बांधणे इ. कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी रु.१४,२४,९२,२३८/- (रुपये चौदा कोटी चोवीस लाख ब्याण्णव हजार दोनशे अडोतीस फक्त) इतक्या रक्कमेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर यांच्यामार्फत करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. |

| | |
|---|---|
| विषय क्र. ११ (३) | सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. |

(टिपणी: सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प आगामी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सीए श्रेणीक शहा यांचे नामनिर्देशन करण्यात आले. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

| विषय क्र. ११ (४) | **UGC Regulation, 2009** नुसार सेवाजेष्ठतेमुळे दि.०१/०१/२००६ रोजी सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदावर पदोन्नती झालेल्या शिक्षकांच्या चेजेंस इन स्टाफची मान्यता देण्याची बाब विचारार्थ. |
|---|---|

| ठराव : | १. **UGC Regulation, 2009** नुसार सेवाजेष्ठतेमुळे दि.०१/०१/२००६ रोजी सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदावर शिक्षकांना Pay Fixation करुन मा.विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर व मा.वरिष्ठ लेखाधिकारी, सोलापूर यांच्या मान्यतेने स्थानिनिश्चिती करण्यात आली आहे, अशा शिक्षकांची प्राध्यापक पदावर स्थाननिश्चिती झाल्यास त्यांना चेजेंस इन स्टाफ मान्यता देताना सहयोगी प्राध्यापक पदावरील चेजेंस इन स्टाफ मान्यतेऐवजी मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर व मा.वरिष्ठ लेखाधिकारी, सोलापूर यांची मान्यता ग्राह्य धरुन चेजेंस इन स्टाफ मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले<br>२. तसेच अशाप्रकारचे जे शिक्षक सहयोगी प्राध्यापक पदाकरिता चेजेंस इन स्टाफ मान्यता घेऊ इच्छितात, त्यांनाही त्यासाठीचे आवश्यक प्रस्ताव सादर करण्याची अनुमती देण्याचे सर्वानुमते ठरले. |
|---|---|

मा. कुलगुरु, प्रभारी प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद